# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान प्रकल्पाच्या पुनर्वसनाच्या जमिन निवाड्याबाबत

**(१) ३३४४० (१२-०१-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान प्रकल्पाच्या पुनर्वसनाच्या जमिनींचे निवाडे न करता धरण ग्रस्तांना वाटप करण्यात आले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपादन झालेल्या क्षेत्रातुन गेलेले कॅनोल, पाझर, तलाव व रोड यांचे क्षेत्र वजा न करता जादा स्लॅब आकारण्यात आला असून संपादित जमीनीचे संयुक्त मोजणी सबंधित शेतकऱ्यांच्या संमती शिवाय करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस अपात्र व मयत धरण ग्रस्तांना चासकमान लाभ क्षेत्रातील जमिनीचे वाटप झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, सबंधित भूमि अभिलेख कार्यालय या विभागाचे दप्तर करण्याबाबत लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अयोग्य भूसंपादन व अनियमितता यांचे पुनर्वीलोकन प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत धरण ग्रस्तांना वाटप व ताबे थांबविणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०३-११-२०२३) :** (१) चासकमान प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मौजे शिक्रापूर व राऊतवाडी ता. शिरुर येथिल जमिनी संपादन करणेकामी प्रस्तावित ९० गटांपैकी ३४ गटांचा निवाडा अंतिम करण्यात येवून खातेदारांना नुकसान भरपाई अदा करण्यात आली.

(२) संपादीत जमिनीच्या संयुक्त मोजणी वेळी नियमानुसार संबंधितांना रितसर नोटीस तामील करुन भुसंपादन प्रतिनिधीचे उपस्थितीत त्यांनी दाखविलेल्या सिमांकनानुसार संयुक्त मोजणी करण्यात आलेली आहे.

(३) मौजे वढु बु ता शिरुर येथील क्षेत्र मयत व्यक्ती मारुती लक्ष्मण भोसले यांचे नावे पर्यायी जमिन म्हणुन वाटप झाल्याबाबत दिसुन येत आहे. यासंदर्भात सविस्तर अहवाल सादर करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४ व (५) पुणे जिल्हा पुनर्वसन कार्यालयातील कामकाजाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी चौकशी समिती गठित केली आह. सदर समितीने सविस्तर चौकशी करुन विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांचेकडे अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे व इतर अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

---

## गेवराई येथील मातोश्री ग्रामसमृद्धी रस्ता योजनेंतर्गत रस्त्यांच्या कामात झालेल्या दुर्लक्षाबाबत

**(२) ४५५०१ (०१-११-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ता योजनेंतर्गत गेवराई विधानसभा मतदारसंघातील अनेक शेत-पाणंद रस्त्यांच्या कामाला मंजूरी मिळाल्यानंतर मंजूर झालेल्या रस्त्याचे ९ लाख २ हजार ८७९ रुपयांचे अकुशलचे काम मजुरांच्या सहाय्याने करणे आवश्यक असतानाही जेसीबीच्या सहाय्याने दोन्ही बाजुची माती उचलून रस्त्यावर टाकणे, विहीर खोदकामातील दगडगोटे टाकणे व रस्ता पूर्ण झाला असे दाखवून अधिकाऱ्यांच्या सहकार्याने बिले उचलण्याचा प्रकार सुरु असल्याचे नागरिकांकडून आलेल्या तक्रारींमुळे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारच्या एक कि.मी.च्या कामासाठी सुमारे २७ लक्ष निधी खर्च करुनही सदरहू कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याने पावसाळ्यानंतर सदर रस्त्यांची दुरावस्था होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांवर प्रत्यक्ष स्थळ पाहणी नियंत्रण करणे आवश्यक असताना प्रशासकीय यंत्रणा कार्यालयात बसूनच नियंत्रण करीत असल्यामुळे सदर कामे दर्जाहीन होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शेत पाणंद रस्त्यांच्या कामपुर्ती व नंतर पुढील पाच वर्षे किंवा इतर योजनेतून सदर रस्त्यांवर खर्च करणे शक्य नसल्याने सदर कामांवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा व बिल रेकॉर्ड करणाऱ्या अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय,

(५) तसेच शेत पाणंद रस्त्याच्या दुतर्फाला झाडे लावणे देखील अपेक्षित असतानाही झाडे लावल्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

गेवराई तालुक्यातील शेत/पाणंद रस्त्यांची कामे पुर्ण झालेली नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच गट विकास अधिकारी व उप अभियंता कामांच्या ठिकाणी भेटी देऊन गुणवत्तेची पहाणी करतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) होय हे खरे आहे.

सद्यस्थितीत शेत/पाणंद रस्त्यांची कामे पूर्ण झालेली नसल्याने रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्यात आलेली नाहीत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात खजूर पिकांची शासनाच्या फळबाग लागवड योजनेत समावेश करण्याबाबत

**(३) ५५३६२ (२९-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात खजूर पिकांची शासनाच्या फळबाग लागवड योजनेत विदर्भ विभागात विशेष बाब म्हणून समावेश करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कोणत्याही नवीन फळपिकाचा फळबाग लागवड योजनेत समावेश करताना त्यास विद्यापीठाची शिफारस आवश्यक असते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर संशोधनाच्या दृष्टीने खजूर फळपिकाची लागवड करण्यात आली असून याबाबतची निरीक्षणे प्रगती पथावर आहेत. यासंदर्भात कृषि विद्यापीठाची शिफारस प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या फळबाग लागवड योजनेत खजूर फळपिकाचा समावेश करण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासन निर्णयातील मास्टर सर्कुलर अर्ज केलेल्या स्वयंसेवी संस्थांना निति आयोगाच्या एनजीओ-पीएस मॉडयुल अंतर्गत नोंदणी करण्याबाबत**

**(४) ५५४५६ (२९-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मास्टर सर्कुलर सन २०२०-२१ नुसार अर्ज केलेल्या स्वयंसेवी संस्थांना निति आयोगाच्या एनजीओ-पीएस मॉडयुल अंतर्गत नोंदणी करण्याबाबत सूचित केले असून सामाजिक संस्थांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची सामाजिक संस्था म्हणून सहभागी करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाच्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत अशासकिय संस्थांना नोंदणी करून समावेशन केले असुन यामध्ये सामाजिक संस्थाच्या भागीदारीने गाव विकासाचे नियोजन व कामाची निवड करणे, १५ व्या वित्त आयोग, जिल्हा नियोजन व विकास समिती व राज्य निधी व्दारे कुशल प्रवण कामे घेणे, जास्तीत जास्त घटकाच्या सहभागी नियोजनवार भर देणे, तसेच तांत्रीक सहाय्यता माथा ते पायथा पानलोट क्षेत्र विकास प्रकल्प, लघुसिंचन बांधकामाचे नियोजन, सामुदायीक मालकी, आपत्ती व्यवस्थापन इ. कामात अधिकाधिक सामाजिक सहभाग वाढवुन कामे करावयास ईच्छुक अशा सामाजिक संस्थाना कोणतेही आर्थिक साह्य न देता सहभागी करुन घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतातील शेतमाल व वाहीपेरीसाठी असलेल्या पांदण रस्त्यांना मार्ग क्रमांक देण्याबाबत**

**(५) ५६४४८ (२९-०१-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतातील शेतमाल व वाहीपेरीसाठी असलेल्या पांदण रस्त्यांना मार्ग क्रमांक नसल्यामुळे शासकीय निधी रस्ते सुधारण्याकरिता देता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्यासाठी व शेतमाल नेण्यासाठी पांदण रस्ते दुरुस्तीबाबतचे अनेक निवेदने प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत सदर पांदण रस्त्यांना निधी व मार्ग क्रमांक देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पांदण रस्त्यांना क्रमांक मिळण्याकरिता जिल्हा परिषद, वर्धा यांच्यामार्फत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर यांना रस्ते विकास आराखडयातील प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. तसेच शेत/पाणंद रस्त्यांचा निधी मनरेगांतर्गत विहीत पध्दतीने देण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात नवीन पशुवैद्यकीय दवाखाने स्थापन करण्याबाबत तसेच पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या दर्जात वाढ करण्याबाबत

**(६) ५८३१६ (१९-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी २ चे रुपांतर श्रेणी १ मध्ये करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांना शासनाने निदेश दिलेले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील येवला व निफाड तालुक्यात पाच ठिकाणी नवीन पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी १ स्थापन करण्यासाठी शासनाने दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास नाशिक जिल्हा परिषदेच्या जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना निर्देश दिलेले होते,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रश्नाबाबत जिल्हा परिषदेकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाले आहेत काय,प्रस्तावानुसार नाशिक जिल्ह्यात नवीन पशुवैद्यकीय दवाखाने स्थापन करण्याबाबत तसेच त्यांच्या दर्जात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-११-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) व (४) होय.
पशुवैद्यकीय दवाखाना श्रे-२ संदर्भात वित्त विभागाचे पशुसंवर्धन विभागाचा सुधारित आकृतीबंध अंतिम झाल्यानंतर प्रस्ताव सादर करावा असे वित्त विभागाने अभिप्राय दिले आहेत. या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाचा सुधारीत आकृतीबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे थकीत असलेले शेततळे अस्तरीकरणाचे अनुदान मिळण्याबाबत

**(७) ५८८३२ (२०-०४-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील शासनाच्या कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या शेततळे अस्तरणीकरणाच्या कामासाठी शेतकऱ्यांना देण्यात येणारे अनुदान मागील दोन वर्षापासून अदा करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यात एकूण किती शेतकऱ्यांचे शेततळे अस्तरीकरणाचे अनुदान अदा करणे प्रलंबीत आहे व त्यासाठी एकूण किती निधीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांना अनुदान अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात काजू फळपीक विकास योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत**

**(८) ५९३६२ (२१-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात काजू फळपीक विकास योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेसाठी शासनाने किती कोटी रुपये मंजूर केले आहेत व सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे ,
(३) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
महाराष्ट्रातील काजूच्या सर्वकष विकासासाठी "काजू फळपिक विकास योजना" लागू करण्याबाबत दिनांक १६/०२/२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.
(२) व (३) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून पुढील ५ वर्षासाठी सदर योजनेस दि.३१/०१/२०२३ मध्ये मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार दि.१६/२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून त्यासाठी रु.१,३२५.०० कोटीची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या मातोश्री पांदण रस्ते योजनेतंर्गत राष्ट्रीय म्हणजे कम-मेरिट शिष्यवृत्ती या ॲपमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याबाबत**

**(९) ६०४४१ (२१-०४-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या मातोश्री पांदण रस्ते योजनेतंर्गत राष्ट्रीय म्हणजे कम-मेरिट शिष्यवृत्ती (एमएमएमएस) हा ॲप शासनाने बंधनकारक केल्यामुळे कधी नेटवर्क तर तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे हे ॲप सुरळीत चालत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच सेलू (जि.परभणी) येथील अनेक रस्ते दुर्गम भागात असल्यामुळे तेथे नेटवर्क नसल्याने तेथे ॲप चालत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेला हे ॲप जाचक अट ठरत असून मजुरांची हजेरी घेणेही अशक्य होत असल्याने सरपंच संघटनेने या ॲपमधील अडचणी दूर करण्यासाठी मा.रोजगार हमी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार माहिती घेवून या ॲपमधील अडचणी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या कामात पारदर्शकता कायम राखण्याकरीता सार्वजिनिक

स्वरूपाच्या कामांमध्ये मजुरांची उपस्थिती एनएमएमएस ॲपवर नोंदविणे अनिवार्य केले आहे. मजुरांची उपस्थिती नोंदविण्यासाठी नेटवर्कची आवश्यकता असते जेथे नेटची अडचण आहे. तेथे उपस्थितीची नोंद घेवून नंतर नेट उपलब्ध झाल्यावर ऑनलाईन करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.
याबाबतग्राम रोजगार सेवक संघटनांचेनिवेदन प्राप्त झाले आहे.
(४)ॲपमधील अडचणी दूर करण्याकरीता अडचणीच्या दिवशी तात्काळ NIC दिल्ली यांचेशी संपर्क साधून अडचण सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुरंदर (जि.पुणे) येथे अंजीर इस्टेटप्रमाणे सिताफळ इस्टेटची संकल्पना राबविण्याबाबत**

**(१०) ६०६४७ (२१-०४-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात अंजीराप्रमाणे सिताफळाच्या मोठ्या प्रमाणात फळबागा आहेत तसेच सिताफळ पिक भौगोलिक हवामानामुळे विशेष प्रसिद्ध असून उक्त तालुक्यातील सिताफळ हे महत्त्वाचे कोरडवाहू पीक म्हणून घेतले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे शासनाने येथे अंजीर इस्टेटप्रमाणे सिताफळ इस्टेटची संकल्पना राबवावी जेणेकरुन सिताफळ उत्पादक शेतकरी सक्षम होतील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिताफळाची उत्पादकता व दर्जा वाढवण्यासाठी पुणे जिल्ह्यात नागपूर अमरावती व वर्धा या जिल्ह्यात स्थापन केलेल्या स्टेट्सच्या धर्तीवर सीताफळ इस्टेट स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे शासनाने यासंदर्भात माहिती व निर्णय घेऊन सीताफळ इस्टेट स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) तालुका बीज गुणन केंद्र, जाधववाडी,ता.पुरंदर,जि.पुणे या प्रक्षेत्राचे शासकीय फळरोपवाटिकेमध्ये रुपांतर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.सदरहू प्रक्षेत्राचे शासकीय फळरोप वाटिकेमध्ये रुपांतर केल्यानंतर सदर फळरोप वाटिकेच्या जागेवर सिताफळ इस्टेट स्थापन करण्याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) परिसरातील अंजीर बागांना थंडीचा फटका बसल्याबाबत**

**(११) ६०६४९ (२१-०४-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) परिसरातील शेतकऱ्यांचे अंजीर हे प्रमुख पीक असून वातावरणातील बदलामुळे या फळपिकांवर करपा व तांबेरा आदी रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अंजीर उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत असून शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१०-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

माहे जानेवारी २०२३ मध्ये आलेल्या थंडीचा अंजीर या फळपिकावर व उत्पादनावर परिणाम दिसून आला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) कृषि विभागामार्फत अंजीर व सीताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वालगुडे व डॉ. प्रदीप दळवी यांच्या उपस्थितीत मौजे\आडाचीवाडी, वाल्हे येथे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना शेतकऱ्यांना सुचविण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर विभागात ३६ पतसंस्थांना शासकीय अर्थसहाय्य (१००%) माफ करण्याच्या मागणीबाबत**

**(१२) ६०७०६ (२१-०४-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर विभागातील ३६ पतसंस्थांना शासकीय अर्थसहाय्य (१००%) माफ करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने अर्थसहाय्य १००% माफ करण्याबाबत सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून अभिप्राय मागविण्याबाबत शासनाने दिनांक ८ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-११-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) कोल्हापूर विभागातील एकूण २० पतसंस्था यांची थकीत शासकीय अर्थसहाय्य कर्ज रक्कम अंदाजित रु.१७.०५ कोटी एवढी आहे. विषयाधीन पतसंस्थांना कर्जमाफी द्यावयाची झाल्यास या अर्थसहाय्याचा लाभ घेतलेल्या राज्यातील इतर एकूण १८४ पतसंस्थांकडून देखील कर्जमाफीची मागणी येण्याची शक्यता आहे. यास्तव कोल्हापूर विभागातील पतसंस्थांना कर्जमाफी देणे संयक्तिक होणार नाही असे प्रस्तावित करून नस्ती मा. मुख्यमंत्री महोदयांच्या

आदेशार्थ सादर करण्यात आली होती. सदर नस्तीवर मा. मुख्यमंत्री महोदयांनी " विभागाने सादर केलेल्या वस्तुस्थितीचे अवलोकन केले आहे." असे निदेश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील बामनवाडा येथिल आदिवासी मालकीच्या जमिनीं बेकायदेशीपणे अकृषक केल्याबाबत**

**(१३) ६१८४३ (२१-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील बामनवाडा येथिल सर्व्हे नंबर ९७,९९ व १६१ या जमिनीवर आदिवासीची मालकी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासीच्या मालकीचे भुखंड त्यांना विश्वासात न घेता बेकायदेशीरपणे अकृषक करून विक्री करून करोडो रूपयांची रक्कम मनी लॉन्ड्रींगमार्फत इतरत्र वळती झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास , उक्त भूखंड विक्रीतील रक्कम इतरत्र वळती झाल्याने प्रकरणाची चौकशी आर्थिक गुन्हा शाखेकडून करावी अशी मागणी दिनांक २७ जुन, २०२२ च्या पत्रान्वये गोंडवाना विकासमंचचे अध्यक्ष बापुराव मडावी यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक चंद्रपूर यांच्याकडे केली आहे , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२३) :** (१) व (२) मौजा बामणवाडा येथील शेत स.क्र.९७ आराजी १.६२ हे. आर, शेत स.क्र.९९ आराजी २.९३ हे. आर, व शेत स.क्र.१६१ आराजी ३.५२ हे. आर ही आदिवासी मालकीची जमीन अकृषक करण्याबाबत प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने जाहीरनामा प्रसिध्द केला असून विहीत मुदतीत आक्षेप प्राप्त झालेले नाही. प्रस्तुत प्रकरणातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी, चंद्रपूर, जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर, ग्रामपंचायत, बामणवाडा यांची नाहरकत, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, चंद्रपूर यांचे प्रमाणपत्र व अभिन्यास मंजूर करण्यात आला त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचे आदेश अनुक्रमे दिनांक ३.७.२०१०, दिनांक २१.३.२०११ नुसार अकृषक रहिवास प्रयोजनाकरीता परावर्तीत करण्यात आलेली आहे.
(३), (४) व (५) अध्यक्ष, गोंडवाना विकास मंच, राजुरा यांचा दिनांक २७.६.२०२२ रोजीचा पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांना अग्रेषित अर्ज उपविभागीय अधिकारी, राजुरा यांनी निर्गमित केलेले अकृषक आदेश नियमबाहय असल्याची तक्रार असल्याने, सदर तक्रार अर्ज पोलीस उप अधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी पुढील चौकशीसाठी व कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयास पाठविली आहे.

याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी, राजुरा यांना चौकशीबाबत कळविण्यात आले असता, त्यांच्या चौकशी अहवालानुसार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे दि.०१.०१.२००४ आदेशानुसार आदिवासी जमिन संबंधात कलम ४४ चे अधिकार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी राखून ठेवले होते. तद्नंतर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी त्यांचे दि.०१.०६.२००४ च्या आदेशानुसार सदर आदेश रद्द करण्यात आले व दि.१७.०६.२०१० च्या आदेशान्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४(१) अंतर्गत जमीन एका प्रयोजनातून दुस-या प्रयोजनात रुपांतर करण्याबाबत पूर्ववत उपविभागीय अधिकारी यांना अधिकार प्रदान केल्याने तक्रारदार श्री.बाबुराव मडावी यांचे दि. १५.०३.२०२२ व दि. २०.०४.२०२२ चे दोन्ही अर्ज नस्तीबध्द करण्यात आले आहेत.

सदर प्राथमिक चौकशी अहवाल उपविभागीय अधिकारी, राजुरा यांच्या दि. २१.०७.२०२३ च्या पत्रानुसार पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांना पाठविण्यात आला आहे.

---

**भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमीनिंचा धारणाधिकार रूपांतरित (भोगवटादार वर्ग -१) करण्यास घातलेल्या बंदी उठविण्याबाबत**

**(१४) ६११९४७ (२१-०४-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भोगवटादार वर्ग – २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमीनिंचा धारणाधिकार रूपांतरित ( भोगवटादार वर्ग -१) करण्यास घातलेल्या बंदी उठविण्यात यावी अशी लेखी मागणी लोकप्रतिनिधींनी राज्याचे मुख्यमंत्री तसेच महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ३१ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन अधिसूचना मार्च २०१९ मध्ये प्रसिद्ध करून शासनाने भाडेपट्ट्याने वा कब्जे हक्काने प्रदान केलेल्या जमिनीचा १० % इतके रूपांतरण शुल्क आकारून भोगवटादार वर्ग बदलण्यात येत होता, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, सदर शासन अधिसूचनेवर घातलेली बंदी उठविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) शासनाच्या दिनांक ०८.०३.२०१९ रोजीच्या अधिसूचनेतील तरतूदीन्वये भाडेपट्टयाने / कब्जे हक्काने कृषी, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक या प्रयोजनासाठी वाटप करण्यात आलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करता येते.

तसेच, सदर सवलतीच्या दराच्या तरतुदीस शासन अधिसूचना दिनांक २७ मार्च, २०२३ नुसार दोन वर्षांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

---

**गायरान जमिनी भूमिहीनांच्या नावे करण्याबाबत.**

**(१५) ६११९८७ (२१-०४-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात गायरान जमिनीवर २ लाख २२ हजारांवर अतिक्रमणधारक असल्याचे शासनाने माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गायरान जमिनी या दलित, आदिवासी कष्टकरांच्या नावावर करण्याबाबत सन १९६१ पासून ते आतापर्यंत २० निर्णय झाले, परंतु अजूनही हा संघर्ष सुरुच असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ बाबत शासनाने निर्णय घेऊन सदरील गायरान जमिनी या भूमीहीनांच्या नावे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ०२/२०२२ प्रकरणी माहिती घेतली असता राज्यामध्ये गायरान जमिनीवर एकूण २,२२,१५३ अतिक्रमणे असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरासाठी ग्रामपंचायतीकडे निहित केलेल्या जमिनी तसेच, गायरान जमिनीवरील अतिक्रमणांबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल सिव्हिल अपिल क्रमांक ११३२/२०११ @ एसएलपी (सी) ३१०९/२०११ जगपाल सिंग व इतर विरुध्द पंजाब राज्य व इतर या याचिकेवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ जानेवारी, २०११ रोजी काही निरीक्षणे नोंदवून अतिक्रमण निष्कासना संदर्भात सविस्तर आदेश दिलेले आहेत.

त्यानुसार, गायरान जमिनीवरील सर्व अनधिकृत आणि बेकायदेशीर अतिक्रमणे निष्कासीत करण्याचे निर्देश आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त नमूद आदेशाच्या अंमलबजावणीकरीता महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक १२ जुलै, २०११ अन्वये सार्वजनिक वापरातील जमिनी / गायरान जमिनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर निर्बंध घालण्याबाबत व अतिक्रमणे निष्कासीत करण्याबाबत क्षेत्रीय अधिकारी यांना सविस्तर दिशा निर्देश दिलेले आहेत.

तसेच, शासन निर्णय, ग्रामविकास विभाग दिनांक १६.०२.२०१८ व दिनांक २२.०८.२०२२ तसेच, शासन निर्णय, नगर विकास विभाग दिनांक १७.११.२०१८ मधील तरतुदीनुसार पात्र असलेली अथवा शासनाच्या यापूर्वीच्या इतर कोणत्याही धोरणांनुसार / तरतुदीनुसार संरक्षित असलेली अतिक्रमणे कार्यवाहीतून वगळण्यात यावीत, अशी भूमिका मा. उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राव्दारे मांडण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ठ आहे.

---

**राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१६) ६२९८५ (२१-०४-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ६५.८३ लाख सक्रिय ग्रामीण मजुर असून यामध्ये २८.६१ लाख महिला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत १०० दिवसांपर्यत रोजगार प्रदान केला जात असून विविध कारणांमुळे सन २०२२ या कालावधीत राज्यातील एकूण ३७,२८० कुटूंबांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक ५ हजार ६१४ कुंटूंबानी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणे थांबवले असून बहुतांश ग्रामपंचायतीनी २० डिसेंबरपर्यंत एकही मनुष्य दिवस रोजगार निर्माण केला नसल्याच्या कारणास्तव अनेक मजुरांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत काम करणे सोडून दिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती आवश्यकती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ६५.९० लाख सक्रिय ग्रामीण मजुर असून यामध्ये २८.६५ लाख महिला असल्याचे नरेगा सॉफ्टवरील दिनांक १३.०२.२०२३ पर्यंतच्या अहवालात नमूद आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यात आर्थिक वर्ष सन २०२२-२३ मध्ये ३,५७,५२७ कामे पूर्ण करण्यात आली असून ८.७५ लक्ष कामे प्रगतीपथावर होती.

(३) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यात ५६१४ वैयक्तिक कामे व ६६ सार्वजनिक कामे हाती घेतली असून, डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत ६४२२३८ इतकी मनुष्यदिन निर्मिती झाली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त तलावाची साठवण क्षमता वाढवून उर्वरित तलावातील गाळ काढण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(१७) ६३११४ (२१-०४-२०२३). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त तलावाची साठवण क्षमता वाढविण्यासाठी व तलावातील गाळ काढण्याकरीता "मिशन अमृत सरोवर" उपक्रम सुरु होवून पाच महिने उलटूनही २११३ पैकी २९% तलावातील गाळ काढण्याची कामे पूर्ण झाल्याबाबतची माहिती माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावातील गाळ काढून पाणी साठवून ठेवण्यासाठी जून महिना अंतिम देण्यात आल्याने निवडलेल्या २११३ तलावांपैकी फक्त ६१४ म्हणजे २९% तलावातील गाळ काढण्याची कामे पूर्ण झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने उर्वरित तलावातील गाळ काढण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-११-२०२३) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

केंद्र सरकारच्या अमृत सरोवर अभियानांतर्गत तलावातील गाळ काढणे, नवीन तलाव तयार करणे व इतर उपचार इ. कामे प्रत्येक जिल्हयात ७५ याप्रमाणे राज्यातील ३४ जिल्हयात एकूण २५५० एवढे राज्याचे उद्दिष्ट होते.

दिनांक ३०.०६.२०२३ रोजी २७७५ अमृत सरोवराची कामे पूर्ण करण्यात आली त्यापैकी नवीन २८२ कामे व २४९३ गाळ काढण्याची कामे पूर्ण करण्यात आली. म्हणजेच निर्धारीत लक्षांकापेक्षा १०८% कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच दिनांक ३०.०८.२०२३ पर्यंत २९७९ अमृत सरोवराची कामे पूर्ण करण्यात आलीत त्यापैकी नवीन ३५७ कामे व २६२२ गाळ काढण्याची कामे पूर्ण करण्यात आली म्हणजेच निर्धारीत लक्षांकापेक्षा ११६% कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सदर कामांची संख्या निर्धारित उद्दिष्टांपेक्षा जास्त आहे.

दिनांक १३.१०.२०२३ रोजी ३०१२ पूर्ण अमृत सरोवरांच्या कामांपैकी २६३८ गाळ काढण्याची कामे हाती घेण्यात आली व पूर्णत्वास नेण्यात आली. ३७४ नवीन तलावांची कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात आली. म्हणजेच निर्धारीत लक्षांकापेक्षा ११८% कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

## कोकण किनारपट्टीवरील सागरी जिल्ह्यातील मच्छिमारांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(१८) ६४९१७ (२४-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनारपट्टीवरील सागरी जिल्ह्यातील मच्छिमारांच्या समस्यासंदर्भात मत्स्यव्यवसायमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ६ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी मच्छिमारांच्या समस्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच उक्त समस्यांवर निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

कोकण किनारपट्टीवरील सागरी जिल्हयातील मच्छिमारांच्या समस्यासंदर्भात दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजी मा.मंत्री मत्स्यव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

(२) सदर बैठकीमध्ये मासेमारी सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत दाखल अपिल निकाली काढणे, ज्या ठिकाणी बांधकाम प्रकल्प सुरू करण्यात येत आहेत त्या सर्व ठिकाणी प्रकल्पाची संपूर्ण माहिती दर्शविणारे फलक लावणे, करंजा बंदराचे बांधकाम तात्काळ पूर्ण करणे, राज्याच्या किनारी भागात पायाभूत सुविधांची कामे हाती घेणे, प्रत्येक जिल्हयात मच्छी मार्केट उभारणे, सातपाटी जि.पालघर बंदरातील गाळ काढणे, मच्छीमारांच्या राहत्या घरांची जागा त्यांचे नावे होण्याकरिता सीमांकन करणे, NCDC अंतर्गत मासेमारी नौकांचे कर्ज माफ करणे, चिंबई-खारदांडा, मुंबई उपनगर समोरील दिपगृह दुरूस्त करणे, खारदांडा येथील बीच स्वच्छ करणे, कोळी महोत्सव सुरू करणे, ससून डॉकच्या गोडाऊन संदर्भात प्रश्न तातडीने निकाली काढणे, शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांना मदत देणे, साखरीनाटे येथे मत्स्यबंदर उभारणे, जिल्हयात चालू असलेल्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पाबाबत सात जिल्हयांत सात स्वतंत्र बैठका घेणे, सोमवंशी समितीची अंमलबजावणी करणे, पर्ससीन, एलईडी, वुम/बुल ट्रॉलिंगवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम कायद्यांतर्गत कार्यवाही करणे.

राज्याच्या किनारी भागात पायाभूत सुविधा करणेसाठी केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत करंजा, ता.उरण, जि.रायगड येथे मत्स्यबंदर, मिरकरवाडा टप्पा-२ जि.रत्नागिरी येथे मत्स्यबंदर, आनंदवाडी, ता.देवगड येथे मत्स्यबंदर विकसित करणे, ससून गोदी बंदराचे आधुनिकीकरण इ. कामे सुरू आहेत. नाबार्ड टप्पा-२ अंतर्गत पाचुबंदर, जि.पालघर, दिवाळे, नवी मुंबई, बोर्ली-मांडला, जि.रायगड, बोऱ्या, जि.रत्नागिरी, नाबार्ड टप्पा-२३ अंतर्गत धाकटी, जि.पालघर, दिघी, जि.रायगड, राजपुरी, जि.रायगड व नाबार्ड टप्पा-२४ अंतर्गत नवाबाग, वेंगुर्ला, जि.सिंधुदूर्ग, नांदगांव, मुरूड, जि.रायगड येथे मच्छिमारांना मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याची कामे सुरू आहे. नाबार्ड-२९ अंतर्गत देवबाग, मालवण, जि.सिंधुदूर्ग, आग्राव, अलिबाग, जि.रायगड, उच्छेली-दांडी, पालघर, जि.पालघर, आरएनपी कोळीवाडा, ता.जि.ठाणे, गोराई, बोरीवली, जि.मुंबई उपनगर येथे मासळी उतरविण्याच्या ठिकाणी मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजना सन २०१६-१७ अंतर्गत वरेडी, पेण, जि.रायगड उत्तन भातोडी, जि.ठाणे, उत्तन पातान बंदर, ता.जि.ठाणे इ. कामे सद्य:स्थितीत सुरू आहेत. निलक्रांती योजनेअंतर्गत बोडणी, ता.अलिबाग येथे जेट्टीचे बांधकाम सुरू आहेत. मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत विकास निधी अंतर्गत हर्णे, जि.रत्नागिरी, साखरीनाटे, जि.रत्नागिरी, जीवना, जि.रायगड, भरडखोल, जि.रायगड, सातपाटी, जि.पालघर येथे पायाभूत सुविधांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत दांडी मकरेबाग, जि.सिंधुदूर्ग, तारामुंबरी, जि.सिंधुदूर्ग, कोर्लई, जि.रायगड, दाभोळ, जि.रत्नागिरी, पालशेत, असगोली, जि.रत्नागिरी, बुधल, जि.रत्नागिरी, शिरोड, जि.सिधूदर्ग, रेवदांडा, जि.रायगड या ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविण्याची कामे प्रस्तावित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या भूमिअभिलेख विभागातील महसूली विभागात जमीन मोजणीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१९) ६५१९४ (२९-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत),श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी)** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्याच्या भूमिअभिलेख विभागातील पुणे, मुंबई, नाशिक,संभाजीनगर, अमरावती, नागपूर या महसुली विभागात १

लाख ४१ हजारापेक्षा अधिक प्रलंबित मोजणी प्रकरणापैकी असलेल्या २७ हजार मोजणी प्रकरणे निकालात निघाली असुन १ लाख १५ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक १९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, कणकवली (जि.सिंधुदुर्ग) येथील भूमी अभिलेख कार्यालयातील आस्थापनेवर मंजूर २१ पदांपैकी केवळ ७ पदे भरलेली असून उर्वरीत १७ पदे रिक्त असल्याने जमिन मोजणिची हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३)तसेच, संगमेश्वर-देवरुख (जि.रत्नागिरी) तालुक्यातील उप अधिक्षक भूमी अभिलेख,या कार्यालयाच्या आस्थापनेवर एकूण १९ पदे मंजूर असून त्यापैकी उप अधिक्षक भूमि अभिलेख हे पद सन २०१८ पासून रिक्त आहे, तसेच १८ पदांपैकी ५ पदे कार्यरत असून १३ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४)तसेच, गेवराई (जि.बीड) येथे भूमी अभिलेख कार्यालयात कार्यरत असलेले उप अधिक्षक भूमिलेख यांच्याकडे गेवराईसह अन्य पाच तालुक्याचा अतिरिक्त कारभार सोपवण्यात आला आहे,तसेच या कार्यालयात मंजूर असलेल्या १६ लिपिक पदापैकी ५ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त रिक्त जागांमुळे उप अधिक्षक भूमी अभिलेख, कार्यालयांतर्गत अभिलेखांच्या नकला पुरविणे, हद्द कायम, पोट हिस्सा, बिनशेती, कोर्ट वाटप, कोर्ट कमिशन, भूसंपादन, शासकीय इत्यादी प्रकारची मोजणी प्रकरणे, भूसंपादन प्रकरणी अभिलेख दुरुस्ती करणे, नागरीकांना अभिलेखांच्या प्रती पुरविणे, कमी जास्त पत्रक, आकारफोड पत्रक, नगर भूसंपादन मिळकत पत्रिका, फेरफार, एकत्रिकरण, तक्रारी अर्ज आदी प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-११-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.

राज्यात माहे मे २०२३ अखेर १०४९९४ मोजणी प्रकरणे प्रलंबित होती. माहे जुन २०२३ ते सप्टेंबर २०२३ पावेतो ६८१८७ मोजणी प्रकरणांची आवक झाली असून माहे जुन २०२३ ते सप्टेंबर २०२३ पावेतो ६८९३४ प्रकरणाचे मोजणी काम पुर्ण झाले असुन सप्टेंबर २०२३ अखेर १०४२४७ प्रकरणे शिल्लक आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख कणकवली कार्यालयाकडे माहे मे २०२३ अखेर १२ पदे रिक्त होती. त्यामुळे सदर कार्यालयाकडे माहे एप्रिल २०२३ अखेर ५८३ प्रकरणे शिल्लक राहिलेली होती.
(३) होय, हे खरे आहे.

माहे एप्रिल-२०२३ अखेर १९ मंजूर पदांपैकी ७ पदे कार्यरत असून १२ पदे रिक्त होती. सरळ सेवा भरती अंतर्गत माहे ऑगस्ट-२०२३ मध्ये ५ नवनियुक्त कर्मचाऱ्यांना नियुक्ती देणेत आली असून सदयस्थितीत उप अधीक्षक भूमि अभिलेख, संगमेश्वर कार्यालयाकडे ७ पदे रिक्त आहेत.
(४) हे अंशत: खरे आहे.

सद्या उप अधीक्षक भूमि अभिलेख, गेवराई यांच्याकडे उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरूर कासार व परळी वैजीनाथ या दोन कार्यालयाचा अतिरीक्त पदभार सोपविण्यात आला आहे. उप अधीक्षक भूमि अभिलेख, गेवराई कार्यालयात १६ भूकरमापक/लिपीक पदांपैकी ५ पदे रिक्त होती. सदर ५ पदांपैकी माहे जुलै २०२३ मध्ये ३ पदे सरळ सेवा भरतीद्वारे भरणेत आली असून २ पदे रिक्त आहेत.
(५) व (६) हे खरे आहे.

मोजणी प्रकरणांची आवक जास्त असल्याने भूकरमापका व्यतिरिक्त अन्य कर्मचारी यांची मोजणी कामी सेवा वापरलेल्या असल्याने तद्नुषंगिक कामे प्रलंबित होती.

राज्यात एकुण १००८ इतकी रिक्त पदे सरळ सेवा भरतीने भरण्यात आलेली आहेत. नवनियुक्त कर्मचाऱ्यांना मोजणी बाबतचे प्रशिक्षण देवून त्यांचेकडून मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे. तसेच भूकरमापक यांना मोजणी काम सुलभ व अचुक होणेसाठी आधुनिक तंत्रज्ञान असलेले रोव्हर्स पुरविण्यात आलेले आहेत. तसेच प्रलंबित मोजणी प्रकरणांचा जलद व अधिक प्रमाणात निपटारा करणेकरिता अपुरी कर्मचाऱ्यांची संख्या असलेले ठिकाणी भूकरमापक यांना मदतनीस पुरविणेत आलेले आहेत.

जनतेची कामे वेळेत व सुरळीत होण्यासाठी e-mojni, ऑनलाईन मिळकत पत्रिका, ऑनलाईन गावनकाशे इ. सुविधा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील मच्छिमारांच्या जमिनी त्यांच्या मालकीच्या होण्यासाठी ड्रोन सर्वेदवारे भूमापन करण्याबाबत**

**(२०) ६५२२० (२५-०८-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील मच्छीमार समाजाच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्यासाठी त्यांच्या गावठाण परिसिमेतील घरांचे महास्वामित्व अभियानअंतर्गत ड्रोन सर्व्हेद्वारे भूमापन करून त्यांना मिळकत पत्रिका व सनद देण्याचे काम प्रगतीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामाची सदयस्थिती काय आहे, आणि कितीजणांना मिळकत पत्रिका व सनद देण्यात आली आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) कोकण प्रदेश, मुंबई विभागात सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, पालघर व रायगड या जिल्ह्यात महास्वामित्व अभियानांतर्गत ड्रोन सर्व्हेद्वारे भूमापनाचे काम करणेत येत असून रत्नागिरी- २१, ठाणे -३, पालघर - ४१, रायगड- ७८ अशा एकूण १४३ गावांमध्ये मच्छीमार बांधवांच्या मिळकती आढळून आल्या आहेत. त्यापैकी रत्नागिरी- ७२९, ठाणे - १०२, पालघर- २७३, रायगड- १३९ अशा एकूण १२४३ मच्छीमार बांधवांना मिळकत पत्रिका व सनद देण्यात आली आहे. गावठाण परिसिमेतील मच्छिमार बांधवासह सर्वच मिळकतधारकांना मिळकतपत्रिका व सनद देण्याचे काम प्रगतिपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सरावली (ता.बोईसर) येथील सरकारी जागेवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(२१) ६५३१८ (०३-०९-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.पो. सरावली (ता.बोईसर) येथील ग्रामपंचायत हद्दीतील अवधनगर या भागात विविध प्रकल्पग्रस्तांना भूखंडावर भूमाफिया मुकरम खान याने अलसिफा मेडिकल गल्ली, कादिर हॉटेल गल्ली मधील सरकारी जागेवर अतिक्रमण करून अनधिकृत चाळी , इमारती व्यापारी गाळे उभे केल्याच्या शेकडो तक्रारी पालघर महसूल विभागाकडे नागरिकांनी लेखी स्वरूपात केल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सरावली सजेचे तलाठी अहवाल बनवून कारवाई करण्यासाठी तहसीलदार यांच्याकडे पाठविल्यानंतर उक्त बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्यांविरोधात तहसीलदार कोणतीही कारवाई करीत नसल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३)असल्यास, पालघर चे तहसीलदार सुनील शिंदे यांची अनधिकृत बांधकाम प्रकरणी वारंवार नोटीस पाठवलेल्या व्यक्ती सुनावणीस उपस्थित राहत नसूनही गैरहजर राहणाऱ्या व्यक्तीच्या अनधिकृत बांधकामा विरोधात महसूल विभाग कारवाई करत नसल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) पालघर तालुक्यातील मौजे सरावली येथील अवधनगर भागात अलसिफा गल्ली, कादीर हॉटेल गल्ली मधील सरकारी जागेवर भूमाफिया मुकरम खान याने चाळी, इमारती व्यापारी गाळे उभे केल्याबाबतची लेखी तक्रार नागरिकांनी दिनांक २८ एप्रिल २०२३ वा त्या सुमारास केल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापी तलाठी सजा सरावली यांनी मौजे सरावली ता. जि. पालघर येथील स.क्र ९०+९१ प्लॉट नं. ४ या शासकीय जमिनीवर मुकरम इद्रीस खान यांनी केलेले अतिक्रमण व तसेच स.क्र ९३+९५ प्लॉट नं. ३ या जमिनीवर श्री. नरेश पांडूरंग पाटील यांनी केलेले अतिक्रमण दुर करून संबंधितांविरूध्द पोलीस स्टेशन बोईसर येथे FIR ११७२/१५ दि. २५/०८/२०१५ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

पालघर तालुक्यातील मौजे - सरावली (बोईसर) येथील अवधनगर अलशिफा रस्त्यावर महाराष्ट्र शासनाच्या जागेवर स.नं ९१,९२,९३ या जमिनीवर श्री. हर्षल लोखंडे या व्यक्तीनी अनधिकृत बांधकाम करून उदयोग सुरू केला असल्याबाबत श्रीम. हरिज्ञा अजमेरसिंग अटवाल रा. बोईसर यांनी दिनांक ०२.०३.२०२३ रोजी तहसिलदार पालघर यांच्या कार्यालयात अर्ज सादर केला आहे.

सदर प्रकरणी तहसिलदार पालघर यांचेकडून सुनावणी घेऊन संबंधित बांधकामधारक यांचेवर कार्यवाही करणेबाबत मंडळ अधिकारी बोईसर यांना कळविण्यात आले होते. तथापी याविरूध्द श्री. हर्षल लोखंडे यांनी दिवाणी न्यायालय पालघर येथे दावा दाखल केल्यामूळे सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सदर दाव्याच्या निर्णयानंतर उक्त बांधकामावर कारवाई करण्याची तजवीज तहसिलदार पालघर यांनी ठेवलेली आहे.

मौजे सरावली, ता.जि.पालघर येथील नवीन स.नं. ९०, ९१, ९२, ९३, ९४, ९५ व ९६ या जमिनी प्रकल्पग्रस्तांना देण्यात आल्या आहेत. प्रकल्पग्रस्तांनी सदर जमिनीवर शेत-लागवड न करता व शासनाची पूर्व परवानगी न घेता अनधिकृतरित्या विक्री केल्या होत्या. सदर जमिनीबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्रकल्पांना देण्यात आलेल्या जमिनीचा शर्तभंग झाल्याने सन २०१२ मध्ये सुमारे २३.७०.० हे. आर जमिनी शासन जमा करण्यात आल्या आहेत.

---

## हिंगोली जिल्हयात विविध शासकिय जिल्हा मुख्य कार्यालये उभारण्याबाबत

**(२२) ६६१७४ (२५-०८-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात अन्न व औषधी प्रशासन, दुग्धविकास कार्यालय, कौटूंबिक निवाडा न्यायालय,जलसंधारण, जलसंपदा आदी जिल्हा मुख्य कार्यालय म्हणून आवश्यक असलेली कार्यालय सुरु करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन जिल्हा स्थापनेनंतर जिल्ह्यात नागरिकांच्या विविध कामाकरिता आवश्यक ती कार्यालये व सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असताना ती सुरु न करण्याची कारणे काय आहेत तसेच , हिंगोली जिल्हा स्थापनेपासून सदरील कार्यालये उभारण्याबाबत नागरिकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने उक्त जिल्ह्यात विविध कार्यालये सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-११-२०२३) :** (१),(२) व (३) हिंगोली येथे मृद व जलसंधारण विभागाच्या दि.२६.०५.२०२२ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली असून, त्यानुसार सदरचे कार्यालय कार्यान्वित आहे.

जलसंपदा विभागांतर्गत लघु पाटबंधारे विभाग हे स्वतंत्र विभागीय कार्यालय जलसंपदा विभागाच्या दि.१४.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आले असून, त्याच्या अधिनस्त ४ उपविभागीय कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत.

अन्न व औषध प्रशासनाच्या हिंगोली कार्यालयासाठी अधिकारी व कर्मचारी यांची पदे मंजुर असून या कार्यालयाकरीता भुखंड उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही अन्न व औषध प्रशासनामार्फत सुरु आहे. सद्यस्थितीत हिंगोली जिल्ह्याचा कार्यभार परभणी जिल्ह्यातून करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत परभणी व हिंगोली जिल्ह्यात शासकीय दुध संकलन बंद असल्याने व जिल्ह्यात सहकारी दुध उत्पादक संघ अस्तित्वात नसल्याने या दोन्ही जिल्ह्यातील दुध संकलन खाजगी प्रकल्पामार्फत करण्यात येत आहे. तसेच, राज्यातील सर्व शासकीय दुध योजनांचे दुध संकलन हे अत्यल्प प्रमाणात आहे. कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या दि.११ नोव्हेंबर,२००२ च्या शासन निर्णयान्वये शासकीय/ शितकरण केंद्र सहकारी दुध संघाकडे हस्तांतरीत करणेबाबत निर्णय घेतला आहे. त्याशिवाय शासनाचा या व्यवसायातून सहभाग टप्प्या-टप्प्याने कमी करावयाचे धोरण असल्याने नविन पद मंजुरी/पद भरती करण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, हिंगोली करीता स्वतंत्र पद निर्मिती व पद भरती करण्यात आलेली नसल्याने सध्या हिंगोली जिल्ह्याचे कामकाज जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, परभणी यांचे मार्फत करण्यात येत आहे.

हिंगोली जिल्हा हा अद्याप न्यायिक जिल्हा म्हणून निर्माण करण्यात आला नाही. या कारणास्तव हिंगोली येथे कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यात आले नाही. सद्यस्थितीमध्ये कौटुंबिक न्यायालय संबंधित खटल्यांचे कामकाज दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) व दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), हिंगोली यांच्यामार्फत पाहिले जाते.

तसेच, प्रस्तुत प्रकरणी नागरिकांचा अर्ज प्राप्त झाला नसल्याचे जिल्हाधिकारी, हिंगोली कार्यालयाने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मढ (ता.अंधेरी, मालाड, जि.मुंबई उपनगर) येथे सार्वजनिक रुग्णालयाकरिता आरक्षित असलेल्या भूखंडाचा ताबा व हस्तांतरण करण्याबाबत**

**(२३) ६६२२३ (२८-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मढ (ता.अंधेरी,मालाड, जि.मुंबई उपनगर) येथील नगर भूमापन क्रमांक १९७ मधील ३०१५.६० चौ.मी.पैकी २३३२.५० चौ.मी. सार्वजनिक रुग्णालयाकरिता आरक्षित असलेल्या भागाचा ताबा मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी बृहन्मुंबई महापालिकेस विनामूल्य हस्तातंरीत करण्याची मागणी महानगरपालिकेने निवासी उपजिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्याकडे दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यासंदर्भातील प्रस्ताव दिनांक १८ एप्रिल २०२३ रोजी वा त्यासुमारास आयोजित केलेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयाकरिता आरक्षित असलेला भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेला तातडीने विनामूल्य हस्तांतरित करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे दिनांक १८ मे, २०२३ रोजी व त्यासुमारास मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचा भूखंड हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) भूखंड महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाकडून दिनांक ३०/०६/२०२३ रोजी आगाऊ ताबा देणेबाबत आदेश पारीत करण्यात आले असून मौजे-मढ, ता.अंधेरी येथील न.भू.क्र.१९७ मधील २३३२.५० चौ.मी. क्षेत्राचा ताबा दिनांक २७/०७/२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सासोली ( ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील कांही जमिनींना दिलेली बेकादेशीर सनद रद्द करुन अनधिकृत बांधकाम हटविण्याबाबत**

**(२४) ६६२७२ (२७-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सासोली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील कांही जमिनींना दिलेली बेकादेशीर सनद रद्द करुन, अनधिकृत बांधकामे हटवा आणि बेकादेशीर वृक्षतोड करणा-यांवर कारवाई करण्यात यावी असे निवेदन तहसिलदार सावंतवाडी यांना देऊनही त्यांनी कारवाई न केल्याने स्थानिक ग्रामस्थांनी उपोषण केल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सनद देतेवेळी सहहिस्सेदारांची संमती नसणे, ग्रामपंचायतीचा व आरोग्य विभागाचा ना हरकत दाखला नसणे, याकडे दुर्लक्ष करुन बेकायदेशीरपणे सनद दिल्याचे तहसिलदार यांच्या निदर्शनास आणून दिली असता तहसिलदार यांनी ग्रामस्थांशी अर्वाचीन भाषा वापरुन अपिल करा असेही सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने संबंधिताविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :** (१) (२) व (३) मौजे सासोली ता.दोडामार्ग जि.सिंधुदुर्ग येथील मौजे सासोली, ता.दोडामार्ग जि.सिंधुदुर्ग येथील स.नं.१५९/१, १६४/१, १५७/१, २००/१, १९८/१, १९८/१, २०१/१, २०३/१, १६७/१, १७१/१ व स.नं.१९७/१ क्षेत्र श्री.सलज जैन वगैरे यांनी नोंदणीकृत खरेदीखताद्वारे खरेदी केल्या आहेत. सदर जमिनी तहसिलदार, दोडामार्ग यांनी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कलम ४२ (क) अन्वये अकृषिक सनद परवानगी देणेत आलेल्या आहेत. सहहिस्सेदार यांचे मालकीचे क्षेत्रात परवानगी दिलेली नसल्याने सहहिस्सेदार यांचे संमतीची आवश्यकता नाही. सदर बिनशेती सनद बाबत कोणतीही हरकत असल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५७ प्रमाणे अपील करण्याची तरतूद असल्याचे उपोषणकर्ते यांना अवगत करण्यात आले आहे.

विषयांकित प्रकरणी श्री.महेश शंकर ठाकूर व इतर यांनी दिनांक १०.०४.२०२३ रोजी केलेल्या उपोषणावेळी झालेल्या चर्चेदरम्यान तक्रारीमध्ये नमूद अनधिकृत होर्डींगबाबत सरपंच, ग्रामपंचायत सासोली यांना दिनांक २२.०५.२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच जंगलतोडीबाबत नमूद मुद्याच्या अनुषंगाने वनक्षेत्रपाल दोडामार्ग यांनी दिनांक २८.०३.२०२३ च्या आदेशान्वये वृक्षतोड करणारे श्री.राजेश चव्हाण, मॅनेजर अमूर डेव्हलपर्स यांना रु.३५,२००/- एवढा दंड करण्यात आला आहे.

तसेच विषयांकित मिळकतीमध्ये दिलेल्या अकृषिक सनदेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी संबंधितांना सनद क्षेत्रात सिमांकन करुन घेतल्याशिवाय व संबंधित ग्रामपंचायत तसेच सहायक संचालक, नगर रचना यांचे परवानगी शिवाय कोणतेही बांधकाम करण्यात येऊ नये असे जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कळविले असून सदर नोटीसी विरुध्द अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका (स्टॅ) क्र.१३४५८/२०२३ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## नंदुरबार तसेच राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये जिल्हा उपनिबंधकांच्या परिसरात विशेष चौकशी नेमण्याबाबत

**(२५) ६६३४७ (२४-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार तसेच राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये जिल्हा उपनिबंधकांनी त्यांच्या परिसरातील अवैध सावकरांवर कारवाई केल्यासंदर्भात शासनाने विशेष चौकशी (एसआयटी) नेमण्याचे आदेश राज्याचे लोकायुक्त यांनी शासनाला दिल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२७-१०-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये अवैध सावकारी व्यवसाय व त्याच्या छळवणूकीतून होणा-या शेतकरी आत्महत्या याविषयी केलेल्या कारवाईची चौकशी संदर्भात, मा. लोक आयुक्त यांच्याकडे दि. ०५.०४.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये विशेष चौकशी समिती (SIT) स्थापन करण्याचे निर्देश शासनास दिले होते.

मा. लोक आयुक्त यांच्याकडील दि. २०.०६.२०२३ रोजीच्या सुनावणीदरम्यान, अवैध सावकारी विरुद्ध कारवाई करण्यासंदर्भात शासनाने दि.०१.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत त्रीस्तरीय समितीची माहिती व राज्यातील समित्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती विभागाने सादर केली. तसेच तक्रारदारांच्या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार यांनी संबंधीत दोषींवर सावकारी अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई केली असल्याचा अहवाल देखील सादर केलेला आहे. विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. लोक आयुक्त यांनी समाधान व्यक्त केले असुन सदर तक्रार निकाली काढण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात रोजगार हमी व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी असल्याबाबत

**(२६) ६६६२० (२५-०८-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-(१) राज्यात रोजगार हमी योजना ही ग्रामीण जनतेला काम मिळण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी करताना काम करणाऱ्या जनतेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी असल्याने बदल करणे आवश्यक असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येते.
(४) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) विलंब झालेला नाही.

---

## मुंबई-वडोदरा महामार्गासाठी तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील बोंबापाडा येथील आदिवासींना मोबदला मिळण्याबाबत

**(२७) ६६७०३ (३१-०८-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-वडोदरा महामार्गासाठी तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील बोंबापाडा येथील सर्वे क्र. २०२ मधील आठ आदिवासी कुटुंबांची घरे, झाडे तसेच जमिनी संपादन केल्या, हे खरे आहे काय,
( २) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्तांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे तसेच उक्त कुटुंबांना शेती आणि घरातून हुसकावून लावल्याने प्रकल्पग्रस्तांनी तसेच तेथील ग्रामस्थांनी तीव्र निषेध व्यक्त करून टायर जाळून सदरहू प्रकल्पाचे काम दिनांक १५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास बंद करुन आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आठ कुटुंबांपैकी केवळ श्री. विजय गुप्ता यांना चुकीच्या पध्दतीने सदर जमिनीचा मोबदला दिला असल्याने तत्कालीन प्रांताधिकाऱ्यांना वसुलीची नोटीस पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-११-२०२३) :** (१), (२), (३) व (४) मुंबई-वडोदरा महामार्गासाठी बोंबापाडा ता. तलासरी, जि. पालघर या तालुक्यातील येथील स.क्र. (२०२/१०) नविन स.क्र.२७५/५ चे खातेदार विद्यावासिनी कॉर्पोरेशन प्रा. लि. यांचे जागेत एकुण ८ आदिवासी शेतकऱ्यांची बांधकाम (घरे) संपादनाखाली आली असुन, त्या ८ घरांची मुळ किंमत सोल्यासियम रक्कम असा एकुण मोबदला रु.१,१९,१३,९४०/- चा निवाडा घोषित केला आहे.

सदर बांधकामाचा मोबदला वाटप करताना खातेदार विद्यावासिनी कॉर्पोरेशन प्रा. लि. यांना रक्कम रु.७५,५७,३३७/- व बांधकामधारकांना रक्कम रु.४३,५६,६०३/- अदा केली होती.

तद्नंतर, संबंधित बांधकामधारकांनी दि.३०/१२/२०१९ रोजी फसवणूक तक्रारी अर्ज केल्याने विद्यावासिनी कॉर्पोरेशन प्रा. लि. तर्फे विजय राजेंद्रप्रसाद गुप्ता यांना अदा केलेल्या रकमेच्या वसुलीबाबत उपविभागीय अधिकारी यांनी पत्र दिले आहे.

त्यानुषंगाने, सदर वसुली रक्कमेपोटी त्यांचे नावे असलेल्या गा.न.नं. ७/१२ वर फेरफार क्र. ६०९ नुसार वसुली रक्कम एवढा बोजा चढविण्यात आला आहे. तसेच, तहसिलदार, तलासरी यांचेमार्फत दि.०५/१२/२०२२ रोजी नियम-५ अन्वये नमुना-१ ची मागणीची नोटीस विद्यावासिनी कॉर्पोरेशन प्रा. लि. तर्फे विजय राजेंद्रप्रसाद गुप्ता यांना बजाविण्यात आली. त्यानुसार आता त्यांची स्थावर मिळकत जाहीर लिलावाद्वारे विक्री करणेकामी जिल्हाधिकारी, पालघर यांची मान्यता घेऊन, जाहीर विक्री लिलाव करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहिरीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ६६७२३ (२८-०८-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरीसाठी सुमारे १५ हजार विहिरीचे उद्दिष्ट ठरविल्यानंतर शेतकऱ्याने रितसर अर्ज शासनाकडे केलेले असून त्यापैकी ४ हजार ५०० प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रलंबित प्रस्ताव लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने वारंवार सूचना देऊनही कार्यवाही न झाल्यामुळे उक्त प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित गट विकास अधिकाऱ्याच्या निलंबनाचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी संबंधिताना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सूचनेच्या अनुषंगाने विहिरीचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या किती व कोणकोणत्या गट विकासक अधिकाऱ्यांविरोधात निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, याप्रकरणी विभागीय आयुक्त्यांच्या आदेशानुसार संबंधित दोषी गटविकास अधिकाऱ्यांच्या निलंबनाचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त कार्यालयाने दिलेले असतानाही आजमितीस सदरहू आदेशाची अंमलबजावणीच झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रस्तावास विलंब करणाऱ्या संबंधित गट विकासकाविरोधात विनाविलंब कायदेशीर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) मराठवाडा विभागातील सर्व जिल्हयांनी सिंचन विहिरींचे प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याची समाधानकारक कार्यवाही केलेली असल्यामुळे, आजपावेतो कोणत्याही गट विकास अधिकाऱ्यांविरुध्द निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(६) विलंब झालेला नाही.

---

**सासोली (ता. दोडामार्ग जि. सिंधुदुर्ग) गावातील ग्रामस्थांची शेकडो एकर सामूहिक जमिन बेकायदेशीररित्या खरेदी केल्याबाबत**

**(२९) ६६९१५ (२७-०८-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सासोली (ता. दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) गावातील येथील सामाईक सर्वे नंबर / हि.नं / १५७ / १, १९९ / १, २ ००/ १, १९८ / १, २०१ / १, २०३ / १, १६७ / १, १७१ / १, १९७ / १ या मिळकतीबाबत जमीन विक्री केलेली नसून सर्व नियम व कायदयांचे उल्लंघन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसीलदार, दोडामार्ग, मंडळ-अधिकारी यांनी चुकीच्या बेकायदेशीर अकृषिक सनद क्र. एनएपी / सनद / ४२ क / एसआर / ०२ / २०२१, अकृषिक सनद क्र. एनएपी / सनद - ४२ क / एसआर / ०४ / २०२१, अकृषिक सनद क्र. एनएपी / सनद - ४२क / एसआर / ०३ / २०२१ या सनदा विजयकुमार गुप्ता, गीता गुप्ता , विकास गुप्ता, अंजली गुप्ता, चालू चैन, हर्षपती सुंदरीलाल, सलज जैन यांच्याशी हात मिळवणी करून चुकीचे आदेश केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सासोली ग्रामस्थांच्या जमिन मिळकतीतून ग्रामस्थांना हद्दपार व्हावे लागणार असल्यामुळे सदर शेकडो एकर जमिनीची झालेली बेकायदेशीर सनद रद्द करण्यासाठी उक्त ग्रामस्थांनी दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास तहसीलदार दोडामार्ग यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बेकायदेशीर जमीन खरेदी सनद प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त सनद प्रकरणी अधिकाराचा दुरुपयोग करून केलेल्या गैरकारभाराबाबत सर्व संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्या विरोधात कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :** (१), (२), (३) व (४) मौजे सासोली ता.दोडामार्ग जि.सिंधुदुर्ग येथील मौजे सासोली, ता.दोडामार्ग जि.सिंधुदुर्ग येथील स.नं.१५९/१, १६४/१, १५७/१, २००/१, १९८/१, १९८/१, २०१/१, २०३/१, १६७/१, १७१/१ व स.नं.१९७/१ क्षेत्र श्री.सलज जैन वगैरे यांनी नोंदणीकृत खरेदीखताद्वारे खरेदी केल्या आहेत. सदर जमिनी तहसिलदार, दोडामार्ग यांनी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कलम ४२ (क) अन्वये अकृषिक सनद परवानगी देणेत आलेल्या आहेत. सहहिस्सेदार यांचे मालकीचे क्षेत्रात परवानगी दिलेली नसल्याने सहहिस्सेदार यांचे संमतीची आवश्यकता नाही. सदर बिनशेती सनद बाबत कोणतीही हरकत असल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५७ प्रमाणे अपील करण्याची तरतूद असल्याचे उपोषणकर्ते यांना अवगत करण्यात आले आहे.

विषयांकित प्रकरणी श्री.महेश शंकर ठाकूर व इतर यांनी दिनांक १०.०४.२०२३ रोजी केलेल्या उपोषणावेळी झालेल्या चर्चेदरम्यान तक्रारीमध्ये नमूद अनधिकृत होर्डींगबाबत सरपंच, ग्रामपंचायत सासोली यांना दिनांक २२.०५.२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच जंगलतोडीबाबत नमूद मुद्याच्या अनुषंगाने वनक्षेत्रपाल दोडामार्ग यांनी दिनांक २८.०३.२०२३ च्या आदेशान्वये वृक्षतोड करणारे श्री.राजेश चव्हाण, मॅनेजर अमूर डेव्हलपर्स यांना रु.३५,२००/- एवढा दंड करण्यात आला आहे.

तसेच विषयांकित मिळकतीमध्ये दिलेल्या अकृषिक सनदेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी संबंधितांना सनद क्षेत्रात सिमांकन करुन घेतल्याशिवाय व संबंधित ग्रामपंचायत तसेच सहायक संचालक, नगर रचना यांचे परवानगी शिवाय कोणतेही बांधकाम करण्यात येऊ नये असे जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कळविले असून सदर नोटीसी विरुध्द अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.१३४५८/२०२३ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## कांजूर (मुंबई) येथील मेट्रो कार शेडसाठी निवडलेली जागा मिठागराचीच असल्याचा दावा केंद्र शासनाने केल्याबाबत

**(३०) ६७११८ (३१-०८-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांजूरमार्ग (मुंबई) येथील मेट्रो कार शेडसाठी निवडलेली जागा मिठागराचीच असल्याचा दावा केंद्र शासनाच्या अखत्यारितील मीठ अधिक्षकांनी केला असून दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास जमिनीचे सर्वेक्षण करण्यापासून राज्य शासनाला रोखले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३)असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :** (१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या विनंतीनुसार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाचया दिनांक १७/०४/२०२३ रोजीच्या आदेशानुसार, मेट्रो मार्गिका-२ च्या कारडेपो व अनुषंगिक वापराकरिता मौ. कांजूर, ता. कुर्ला, स.नं.२७५, न.भू.क्र. ६५७-अ मधील १५ हेक्टर जमिनीचा आगाऊ ताबा नगर भूमापन अधिकारी, मुलंड यांना दिनांक १९/०४/२०२३ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना दिला आहे. तद्नंतर उपनमक आयुक्त यांनी दिनांक २१/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर जागा केंद्र सरकारची असून उक्त जागेत सर्वेक्षण करण्यास हरकत असल्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयास कळविले होते.

(२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे दिनांक २१/०५/२०१५ रोजीचे आदेश आणि तत्का. मा. मंत्री (महसूल) यांचे दिनांक ०१/११/२०१८ रोजीचे आदेश यानुसार सदर जमिनीची मालकी " महाराष्ट्र शासनाची" निश्चित झालेली आहे. सदर जमीन राज्य शासनाच्या मालकीची असल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला आगाऊ ताबा देण्याची केलेली कार्यवाही योग्य असल्याबाबत उपनमक आयुक्त यांना जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी कळविलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर, (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कुंडी निगुडवाडी येथील स्वांतत्र्य सैनिकाची जमीन अदानी ट्रान्समिशन कंपनीने हडप केल्याबाबत**

**(३१) ६७२७५ (२९-०८-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर, (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कुंडी निगुडवाडी येथील निवृत्त दलित स्वातंत्र सैनिक भिका कुशा महार यांना राज्य शासनाकडून ७६ एकर जमीन वतन म्हणून देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जमिन अदानी ट्रान्समिशन कंपनीने शासनाकडून परस्पर खरेदी केली असून अद्याप मुळ मालकांना त्याचा मोबदला मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, याशिवाय जिल्हयातील अनेकांच्या जमिनी शासनाने परस्पर उद्योजकांना दिल्या असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन उक्त जमिनी मुळ मालकांना परत करण्याबाबत तसेच त्याचा मोबदला देण्याबाबत याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :** (१), (२) व (३) मौजे कुंडी व निगुडवाडी ता.संगमेश्वर जि.रत्नागिरी येथील सन १९५५-१९५६ ते आज पर्यंतचे अधिकार अभिलख पाहता श्री.भिका कुशा महार यांना राज्य शासनाकडून ७६ एकर जमीन मिळकती वतन म्हणून दिल्याच्या नोंदी दिसून येत नाही. तसेच अदानी ट्रान्समिशन कंपनीने शासनाकडून परस्पर खरेदी केल्याच्या तसेच संगमेश्वर तालुक्यातील जमिनी शासनाने परस्पर उद्योजकांना दिल्याच्या कोणत्याही नोंदी अभिलेखात दिसून येत नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचवटी पांजरपोळ सस्था,नाशिक यांनी धर्मदाय आयुक्त यांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करून बिगर शेतकरी व्यक्तीस विक्री केल्याबाबत**

**(३२) ६७३२६ (२७-०८-२०२३). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचवटी पांजरपोळ संस्थेनेपूर संस्था, नाशिक या संस्थेने संस्थेची शेत जमीन धर्मदाय आयुक्त यांच्या आदेशाचे उल्लंघन करून १२ बिगर शेतकरी संस्थांना विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तहसीलदार कार्यालय नाशिक यांनी कोणती कारवाई केली आहे, तसेच बेकायदेशीर जमीन बिगर शेतकरी व्यक्तींना विकल्याबाबत सदर जमीन शासन जमा करून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तहसिलदार नाशिक यांनी मौजे मखमलाबाद , ता. जि. नाशिक येथील सर्व्हे नंबर ३८४, ३८५, ३८६ व ३८७ ह्या मिळकतीच्या मुंबई कुळवहीवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ८४ (क) नुसार केस दाखल केली होती. त्यानुसार सदर प्रकरणात मौजे मखमलाबाद येथील सर्व्हे नंबर ३८४ ते ३८७ हया मिळकतीच्या मुंबई कुळवहीवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ६३ सह ८४ (क) नुसार चौकशी करणेकामी तहसिलदार संजय गांधी योजना तथा चौकशी अधिकारी, नाशिक यांनी सुनावणी घेवुन दिनांक ०३/०३/२००७ च्या आदेशान्वये, मौजे मखमलाबाद ता. जि. नाशिक येथील सर्व्हे नंबर ३८४, ३८५, ३८६ व ३८७ ह्या मिळकतीच्या मुंबई कुळवहीवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ८४ (क) नुसार चौकशी बंद करण्याचे आदेशीत केलेले होते.

सदर आदेशाविरुध्द तहसिलदार नाशिक यांनी दिनांक १०/८/२००७ रोजी कलम ७६ अ अन्वये पुनरीक्षण अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने म. विशेष पुनरीक्षण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचे न्यायालयात सुनावणी घेण्यात आली त्यानुसार टी. एन. सी. / नाशिक केस / मखमलाबाद/१६७/०४/ पुनर्विलोकन क्रं. १७१/ ०९ दिनांक १७/०३/२०१० अन्वये तहसिलदार नाशिक यांचा दि. १०/०८/२००७ रोजीचा पुनरिक्षण अर्ज फेटाळून लावल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सात वाहन काळापासून असणा-या सुमारे २० हजार बारवांचे पुनरुज्जीवन करण्याच्या निर्णयाबाबत**

**(३३) ६७७७६ (२९-०८-२०२३). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सात वाहन काळापासून असणा-या सुमारे २० हजार बारवांचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २५ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,पुनरुज्जीवन करण्याबाबतचे स्वरुप काय आहे तसेच उक्त प्रकरणी शासनाने एकूण किती तरतूद केली व याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-११-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यातील उत्कृष्ट स्थापत्यशैलीचा नमुना असलेल्या ७५ प्राचीन बारवांचे संवर्धन करण्याचे नियोजन आहे.

(२) बारव पुनरुज्जीवन व स्थापत्याचे जतन संवर्धनासाठी शासन निर्णय दि.१८ मे, २०२३ नुसार तज्ञांचा समावेश असलेली बारव संवर्धन समिती गठीत करण्यात आली आहे. बारवांसंदर्भातील दस्तावेज तपासून पुरातत्व निकषात बसत असलेली बारव राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झाल्यानंतर जतन संवर्धनासाठी अंदाजपत्रक तयार करुन जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माहूर(जि.नांदेड) तालुक्यातील तहसीलदार यांनी कुळ हक्काने प्राप्त झालेली जमीन नियमबाहयरित्या विक्री केल्याबाबत**

**(३४) ६८१७२ (२७-०८-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर(जि.नांदेड) तालुक्यातील तहसीलदार किशोर राजाभाऊ यादव यांनी वाई बा. येथील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना कुळ हक्काने प्राप्त झालेली भोगवटादार वर्ग-२ मिळालेली जमीन जिल्हाधिकारी यांचे अधिकार वापरुन व्यापारी लोकांना विक्री केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तहसीलदार यांच्या गैरव्यवहार प्रकरणात वस्तुनिष्ठ चौकशी करुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे आदेश अप्पर जिल्हयाधिकारी नांदेड यांनी दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास किनवट सहाय्यक जिल्हाधिकारी यांना दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासंर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
अशा आशयाची तक्रारदार श्री. खान साजिद माजिद रा.वाई (बा), ता. माहुर, जि.नांदेड यांची तक्रार दि.१९/०४/२०२३ अन्वये विभागीय आयुक्तांमार्फत जिल्हाधिकारी, नांदेड कार्यालयात प्राप्त झाली होती. प्रस्तुत प्रकरणी सहायक जिल्हाधिकारी, किनवट यांच्यामार्फत चौकशी सुरु असुन प्रकरण सुनावणी स्तरावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथे पालकमंत्री पाणंद रस्ते बांधकामासाठी वितरीत करण्यात आलेला निधी कार्यकारी यंत्रणेकडून पूर्णपणे खर्च करण्यात आला नसल्याबाबत**

**(३५) ६८२८२ (२९-०८-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथे जिल्हाधिकारी यांचेकडून सन २०२०-२०२१ मध्ये पालकमंत्री शेत-पाणंद रस्त्यांचे बांधकाम करण्यासाठी वितरीत करण्यात आलेला निधी अद्यापपर्यंत कार्यकारी यंत्रणेकडून पूर्णपणे खर्च करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी (राजस्व) मोर्शी यांनी ९९ ब वर्ग पालकमंत्री पाणंद रस्त्यांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती व त्यासाठी रुपये १,२७,५२५/- इतक्या निधीची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे केली असूनही फक्त ४६ रस्त्यांच्या कामासाठी फक्त रुपये ५६,२६,०००/- निधी वितरीत करण्याचा आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी कार्यकारी यंत्रणेकडून निधी खर्च झाला नसताना पुन्हा माहे नोव्हेंबर, २०२१ व मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कोणत्या नियमानुसार निधी वितरण करण्यात आला आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
उपविभागीय अधिकारी, मोर्शी यांच्या मागणीनुसार एकुण १,०७,४४,३१५/- इतका निधी वितरित करण्यात आला आहे, अमरावती जिल्हातील मोर्शी या उपविभागाची पालकमंत्री शेत/ पांदण रस्ते योजनेमधील भाग "ब" प्रकारच्या रस्त्यांसाठी कोणतीही निधी मागणी प्रलंबित नाही.
(३) नविन रस्ते कामांसाठी नियमानुसार माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये रु.४,८८,१७,८२८/- व माहे मार्च, २०२२ मध्ये रु.३६,५३,०७४/- इतका निधी पालकमंत्री शेत/ पाणंद रस्ते योजनेंतर्गत वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरजगाव (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील ई क्लास जमिनची मोजणी निशुल्क करण्याबाबत**

**(३६) ६८४८८ (२५-०८-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरजगाव (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील ई क्लास जमिन गट नं. १०९ सर्वे नं.२४ क्षेत्र ६.३१ हे आर ची निशुल्क मोजणी करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक ११ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निशुल्क मोजणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन्माननीय लोकप्रतिनिधी यांचे निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक २०/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, मोर्शी यांना मौजे शिरजगाव गट नं. १०९/ सर्वे नं.२४ क्षेत्र ६.३१ हे आर जमीनीची निशुल्क मोजणी करण्याप्रकरणी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार तहसिलदार, मोर्शी यांनी उपअधिक्षक,भूमी अभिलेख,मोर्शी यांना प्रकरणी नियमानुसार कार्यवाही व अहवाल सादर करण्यास कळविले. त्यास अनुसरून उपअधिक्षक, भूमी अभिलेख, मोर्शी यांनी दि.०७/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मुख्याध्यापक तसेच शाळा व्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, शिरजगाव, तालुका मोर्शी, जिल्हा अमरावती यांना प्रस्तुत विषयी रितसर मोजणी अर्ज, मोजणी करीता आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबत कळविले. प्रकरणी मागणी करण्यात आलेल्या कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर सत्वर कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातीज काही जिल्ह्यात अवैध सावकारांवर कारवाई करुन शासनाने विशेष पथक (एस.आय.टी.) नेमण्याबाबत**

**(३७) ६८५०३ (११-०९-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली व नागपूर जिल्ह्यासह उपनिबंधकांनी त्यांच्या परिसरातील अवैध सावकारांवर कारवाई करुन शासनाने विशेष पथक (एस.आय.टी.) नेमण्याबाबत लोकायुक्तांना आदेश दिले असल्याची माहिती माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार लोकायुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार अवैध सावकारांवर विशेष तपास पथकाद्वारे कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

मा. लोक आयुक्त यांनी नंदुरबार जिल्ह्यातील अवैध सावकारीबाबतच्या तक्रारीवरील दि. ०५/०४/२०२३ रोजीच्या सुनावणी दरम्यान नंदुरबार जिल्ह्यासह राज्यातील उपनिबंधकांनी त्यांच्या परिसरातील अवैध सावकारांवर केलेल्या कारवाईची चौकशी करणे संदर्भात विशेष चौकशी समिती (SIT) स्थापन करण्याचे निर्देश शासनास दिले होते.

(२) उपरोक्त प्रकरणामध्ये मा. लोक आयुक्त यांच्याकडील दि. २०.०६.२०२३ रोजीच्या सुनावणीदरम्यान, अवैध सावकारी विरुद्ध कारवाई करण्यासंदर्भात शासनाने दि.०१.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत त्रिस्तरीय समितीची माहिती व राज्यातील समित्यांनी केलेल्या कार्यवाहीची

माहिती विभागाने सादर केली. तसेच तक्रारदारांच्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधीत दोषींवर सावकारी अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई केली असल्याचा अहवाल देखील सादर केलेला आहे. विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. लोक आयुक्त यांनी समाधान व्यक्त करुन मुळ तक्रार निकाली काढली आहे. मुळ तक्रार निकाली काढल्यामुळे विशेष चौकशी समिती (SIT) स्थापन करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांत झालेला गैरव्यवहार**

**(३८) ६८५५५ (२८-०८-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली येथील भामरागड, अहेरी व मुलचेरा या दुर्गम तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांचे प्रस्ताव व निधीची मागणी नव्हती तरीही कंत्राटदार व यंत्रणेतील लॉबीसाठी थेट मंत्रालयातून कोट्यवधी निधी आल्याची माहिती माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात २३ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आरोप करण्यात आला असून तीन ग्रामसेवकांना निलंबन केले असल्याने सर्व अधिकाऱ्यांची सुटका झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :** (१) हे, खरे नाही.
क्षेत्रीय पातळीवरुन निधी मागणी झाल्यानंतर निधी वितरीत करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
भामरागड, मुलचेरा व अहेरी या तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामांमध्ये वेगवेगळया अनियमीतता आढळून आल्या आहेत. चौकशी समितीच्या अहवालानूसार तीन तालुक्यातील २६ अधिकारी व कर्मचारी हे जबाबदार असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर प्रकरणात ३ ग्राम सेवकांना निलंबित करुन त्यांच्यावर कारवाई सुरु असुन एकुण २६ अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रशासकीय कारवाई सुरु करण्यात आली आहे.
(३)जिल्हा परिषद स्तरावरुन केलेल्या चौकशी समितीच्या अहवालास अनुसरुन भामरागड व अहेरी तालुक्यातील एकुण ३ ग्रामसेवकांना निलंबित करण्यात आले आहे. भामरागड, तालुक्यातील ११, अहेरी तालुक्यातील ८ व मुलचेरा तालुक्यातील ७ अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी व अन्य प्रशासकीय कारवाई सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील गट विकास अधिकारी यांच्या बहिष्कारामुळे**
**रोजगार हमी योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३९) ६८७६१ (२८-०८-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात गटविकास अधिकाऱ्यांनी दिनांक ११ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावर बहिष्कार टाकला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बहिष्कारामुळे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांची वैयक्तिक लाभांची तसेच वृक्ष लागवड, विहिरी व रस्ते अशी विविध कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात गट विकास अधिकाऱ्यांच्या बहिष्कारामुळे रोजगार हमी योजनेच्या कायद्यानुसार जॉब कार्डधारक मजुरांना काम असूनही शंभर दिवसाचे काम मिळू शकत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार मजुरांना काम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
गट विकास अधिकारी यांच्या कामे न करण्याच्या बहिष्कारामुळे कामे खोळंबल्याचे निदर्शनास आलेले नसुन यंत्रणेमार्फत कामे सुरू होती.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

## उंदरी (ता.केज, जि.बीड) येथील सेवा सहकारी संस्थेच्या लेखापरिक्षणाचा चुकीचा व अर्धवट अहवाल सादर केल्याबाबत

**(४०) ६८८४८ (२९-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उंदरी (ता.केज, जि.बीड) येथील सेवा सहकारी संस्थेत लेखापरिक्षणामध्ये निर्माण झालेल्या १० दोषींवरती परत एकदा लेखापरिक्षण करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, बीड यांनी दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री.एस.बी.देशमुख लेखापरिक्षक (श्रेणी-२) सहकारी संस्था यांची लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त लेखापरिक्षक यांनी दोषींना पाठीशी घालण्याच्या उद्देशाने चुकीचा अर्धवट पूर्ण १० मुद्यांची चौकशी न करता अहवाल सादर केल्याचे निदर्शनास आले असून तशी तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात लेखापरिक्षणासाठी विहित केलेल्या पूर्ण १० मुद्यांवरती तपासणी न करता, कोणत्याही स्वरुपाचे त्यांचे स्पष्ट मत न नोंदवता, ठेवावयाच्या नोंदवह्या, खातेपुस्तक, परिशिष्ट याची तपासणी पडताळणी न करता अर्धवट व चुकीचा अहवाल दिल्याप्रकरणी संबंधीतांवर कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १५ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधीत दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा कण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-११-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) श्री. एस. बी. देशमुख, लेखापरीक्षक श्रेणी-२, सहकारी संस्था, केज यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, उंदरी, ता. केज, जि. बीड या संस्थेचे चाचणी लेखापरीक्षण करताना परिशिष्ट ब मधील १ ते १० मुद्यांचे स्वतंत्र विवेचन करणे आवश्यक असताना एकत्रित विवेचन केले आहे. तथापि, सदर मुद्दे दोषदुरूस्तीस पात्र असल्यामुळे संस्थेने दोष दुरूस्ती करून नमूद दोषांची दुरूस्ती करणे अपेक्षित आहे. सदर संस्थेने दोष दुरूस्ती अहवाल पाठविला नसल्याने त्यास संस्थेचे संचालक मंडळ जबाबदार असल्याचा शेरा नमूद केला आहे.

श्री. एस. बी. देशमुख यांनी चाचणी लेखापरीक्षण हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१(३) क नुसार तसेच चाचणी लेखापरीक्षण करण्यासाठी दिलेल्या परीपत्रकीय सुचनेनुसार केले असून सदर अहवालातील शेऱ्यावरूनच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. केज यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. उंदरी या संस्थेचे सचिव श्री. सुनिल ठोंबरे यांना रू.१५,०००/- एवढ्या रक्कमेचा दंड केला आहे. सदर चाचणी लेखापरीक्षण

अहवालामध्ये परिशिष्ट अ मधील ०१ ते ०६ व परीशिष्ट ब मधील ०१ ते १० मुद्यांबाबत श्री. एस. बी. देशमुख यांनी सदर चाचणी लेखापरीक्षण अहवाल कलम ८१(३) (क) प्रमाणे दिलेला असून तो कायदेशीर आहे, असे चौकशी अहवालात स्पष्ट नमूद केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्रात नाशवंत कृषी मालासाठी प्रक्रिया उद्योग उभारणीबाबत

**(४१) ६९११८ (२७-०८-२०२३). अॅड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यात फळे आणि भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी असून, नाशवंत अन्नाची नासाडी टाळण्यासाठी तसेच प्रक्रिया उद्योगास चालना देण्यासाठी राज्य पुरस्कृत 'मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना' आणि केंद्र पुरस्कृत 'प्रधानमंत्री किसान संपदा योजना' लागू करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात नाशवंत मालाची साठवणूक करण्यासाठी साठवण केंद्रे (शीतगृह) उभारावीत अशी देखील मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, नाशवंत कृषी मालासाठी प्रक्रिया उद्योग उभारणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय,हे खरे आहे.
एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत शीतगृह हा घटक राबविण्यात येतो.सदर घटकासाठी सर्वसाधारण क्षेत्राकरीता ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ३५टक्के ( कमाल रक्कम रु.१४०.०० लाख ) व डोंगराळ / अधिसुचित क्षेत्राकरीता ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के ( कमाल रक्कम रु.२००.०० लाख ) अनुदान देय आहे. सदर घटक हा महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येतो.
(३) नाशवंत कृषी मालासाठी प्रक्रिया उद्योगाकरीता कृषि विभागामार्फत खालील प्रमाणे योजना राबविण्यात येतात.
१) मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART)
२) नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (POCRA)
३) केंद्र शासन सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)
४) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्राथमिक प्रक्रिया केंद्र.
५) मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना.
६) महाराष्ट्र राज्य छोटया शेतकऱ्यांचा कृषि व्यापार संघ (SFAC)
७) कृषि पायाभूत सुविधा योजना (AIF)
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील गट विकास अधिकारी यांच्या बहिष्कारामुळे रोजगार हमी योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४२) ६९१६२ (११-०९-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात गटविकास अधिकाऱ्यांनी दिनांक ११ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावर बहिष्कार टाकला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बहिष्कारामुळे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून सर्व कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात गट विकास अधिकाऱ्यांच्या बहिष्कारामुळे तसेच गटविकास अधिकाऱ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

दि.२८.०४.२०२३ च्या परिपत्रकानुसार मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक व सामुहीक स्वरुपातील होणाऱ्या कामांची संख्या, उपस्थित मजुरांची संख्या या बाबी विचारात घेता, मजुरांच्या उपस्थिती/अनुपस्थितीबाबत अथवा त्यांचे सत्यतेबाबत पंचायत समितीस्तरावरील गट विकास अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येणार नसल्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**मौजे खारेपाट (ता. पेण, जि.रायगड) मे.मुंबई एस.ई.झेड लि. कंपनीने प्रकल्प सुरु न केल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनी परत करण्याबाबत**

**(४३) ६९२०४ (३१-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे, खारेपाट (ता. पेण, जि.रायगड) महसूल विभागातील शेतक-यांच्या शेत जमीनीसंदर्भात मे.मुंबई एस.ई.झेड लि. कंपनीने/SEZ Ltd व महाराष्ट्र शासनासमवेत दिनांक ८ जून, २००७ रोजी वा त्यासुमारास करार केला असून करारामध्ये निवडण्याचा व पुनर्वसनाचा उल्लेख केला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र प्रकल्पबाधित पुनर्वसन कायदा १९९९ चे कलम १२(१) व (१२) अन्वये खरेदी केलेल्या जमीनीच्या बदल्यात पुनर्वसन पॅकेजनुसार शेतकऱ्यांचे पुनर्वसन अद्याप झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-११-२०२३) :** (१), (२) व (३) मौजे, खारेपाट (ता. पेण, जि. रायगड) महसूल विभागातील शेतक-यांच्या शेत जमीनीसंदर्भात मे. मुंबई एस.ई. झेड लि. कंपनीने/SEZ Ltd व महाराष्ट्र शासनासमवेत दिनांक ८ जून, २००७ रोजी वा त्यासुमारास करार केला असून करारामध्ये पुनर्वसनाचा उल्लेख केलेला आहे.

भुसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम ४ खाली अधिसूचित केलेल्या जमिनीबाबत महाराष्ट्र प्रकल्पबाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कायदा १९९९ चे कलम १२(१) (२) अन्वये जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचे आदेश

दि. ३०/११/२००६ नुसार जमिनी साठेकरार करण्यासाठी अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात आली होती.

दि. १५/०५/२००६ रोजी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लि. व महाराष्ट्र शासन यांच्यादरम्यान सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लि. व जिल्हाधिकारी, रायगड यांच्यादरम्यान दि.०८/०६/२००७ रोजी भुसंपादन अधिनियम कलम ४१ नुसार करारनामा झाला आहे. सदरील सामंजस्य करारानुसार कंपनी व शासन यामध्ये पुनर्वसन पॅकेज अंमलात आणण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर जिल्ह्यातील मातोश्री ग्रामसमृध्दी शेत पाणंद रस्ते योजनेतील कामांना गती देण्याबाबत

**(४४) ६९४७८ (२९-०८-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात मातोश्री ग्रामसमृध्दी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत ६०६ रस्त्यांना मंजूरी असताना फक्त ४० कामे सुरु असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे पावसाळ्यापूर्वी न झाल्यास शेतकऱ्यांना त्रासदायक होणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सर्व मंजूर कामांना गती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (११-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे,

प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर लगेच संबंधित यंत्रणेस कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. मजुरांमार्फत कामाची मागणी प्राप्त होताच कामे सुरु करता येतील.

(३) कामे सुरु करण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्ह्यात मातोश्री पाणंद रस्त्यांची कामे होत नसल्याबाबत

**(४५) ६९५०७ (२७-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मातोश्री पाणंद रस्त्यांची अजूनही सुधारणा झाली नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात विशेषतः चिखली आणि बुलढाणा तालुक्यात मातोश्री पाणंद रस्त्यांची कामे करण्यास शासनाने सहमती दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मातोश्री पाणंद रस्त्यांची कामे मंजूर असताना अजूनही कोणत्याही यंत्रणेने कामे सुरु केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत मातोश्री पाणंद रस्त्यांची कामे सुरु करण्यास दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

चिखली व बुलढाणा तालुक्यात एकुण ३८० शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांस शासन स्तरावरुन मंजुरी देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

चिखली तालुक्यातील ८७ व बुलढाणा तालुक्यातील १८ कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तसेच ९ कामे सुरु आहेत. मनरेगा योजनेशी अभिसरणाद्वारे योजना राबविण्यात येत असल्याने मजूरांमार्फत कामाची मागणीनुसार कामे सुरु करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सेंद्रिय शेती प्रमाणीकरण यंत्रणा उभारणे व सेंद्रिय शेतीला चालना देण्याबाबत

**(४६) ७०१७७ (२८-०८-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी सेंद्रिय शेती करीत असून त्या शेतीला सेंद्रिय शेतीचा माल विकत घेणेही मोठा प्रश्न निर्माण झाल्याने सेंद्रिय शेती प्रमाणीकरणाची व सेंद्रिय शेतीला चालना देण्याची गरज निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सेंद्रिय शेतीच्या प्रमाणीकरणासाठी जिल्हानिहाय स्वतंत्र शासकीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सेंद्रिय शेती प्रमाणीकरण यंत्रणा उभारण्याबाबत व सेंद्रिय शेतीला चालना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०३-११-२०२३) :** (१ ) हे खरे आहे,

(२) हे खरे नाही.

(३) शासनाने कृषि व पदुम विभागाच्या दिनांक २७.०८.२०२१ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरावर सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणा स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. संस्था अधिनियम १८६० अंतर्गत सदर संस्थेची नोंदणी झालेली आहे. या संस्थेचे अपेडा अंतर्गत ॲक्रीडेशन प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर आवश्यक त्या बाबींची पुर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच सेंद्रिय शेतीला चालना देणेसाठी शासन निर्णय दिनांक २७ जुन, २०२३ अन्वये राज्य पुरस्कृत डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजना राज्यभर राबविण्यास मान्यता दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्धवत नाही

---

## राज्य शासनाने नव्याने अंमलात आणलेल्या ऑनलाईन सातबारा नोंदणी मध्ये त्रुटी असल्याबाबत

**(४७) ७०२९८ (२५-०८-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नव्याने अंमलात आणलेल्या सातबारा ऑनलाईन नोंदणी योजनेमध्ये अनेक तांत्रिक स्वरूपाच्या त्रुटी असल्यामुळे सदोष नोंदणी होणे, प्रत्यक्ष जमिनीच्या क्षेत्रापेक्षा ऑनलाईन नोंदणी झालेले जमिनीचे क्षेत्र कमी असणे अशा अनेक दोषांमुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रत्यक्ष जमिनीचे क्षेत्रापेक्षा ऑनलाईन नोंद झालेले जमीनीचे क्षेत्र वेगळे असणे किंवा तत्सम दुरूस्त्या या महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १५५ (लेखन प्रमादामुळे झालेल्या चुका दुरूस्ती) तहसीलदाराकडून आदेशाने दुरुस्त करण्यात येतात. सद्यस्थितीमध्ये ऑनलाईन नोंदविण्यात आलेल्या कलम १५५ प्रकरणात प्रलंबित असणाऱ्या सर्व्हे क्रमांकाची एकूण संख्या ही केवळ ९,०१८ (०.०३%) इतकी आहे. तथापि लेखन प्रमाद दुरूस्ती गांभीर्याने घेऊन शासनाने तहसिलदार स्तरावर ऑफलाईन मार्गाने संगणकीकृत ७/१२ व हस्तलिखित ७/१२ या मध्ये तफावतीबाबत कलम १५५ अन्वये दुरूस्ती करण्यासाठी सादर करण्यात आलेले अर्ज प्रणालीमध्ये नोंदविण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच दिनांक ०१/०८/२०२३ पासून कलम १५५ खालील लेखन प्रमाद दूरूस्ती अर्ज केवळ

Online स्वरूपात घेणेच्या सूचना राज्यातील महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळमना (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) या गावात तेलंगणा येथील चोर बीटी बियाणांची साठवणूक करुन अनधिकृत विक्री करीत असल्याबाबत

**(४८) ७०५८३ (२८-०८-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमना (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) या गावात तेलंगणा येथील चोर बीटी बियाणांची साठवणूक करुन आमडी, किन्ही, कोर्टी, दहेली, कोठारी, पळसगाव आदी गावात चोर मार्गाने विक्री करीत असल्याचे दिनांक ३ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विभागाने यावर प्रतिबंध करण्याकरिता पथके स्थापन केली असूनही ही पथके कागदावरच असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त चोर मार्गाने विक्री करणाऱ्या संबंधितांवर तसेच अवैध विक्री रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) चंद्रपूर जिल्ह्यात एकुण १६ भरारी पथके आहेत.जिल्हा पोलिस अधिक्षक, चंद्रपूर यांच्या सहकार्याने चंद्रपूर जिल्ह्यात भद्रावती, गोंडपिंपरी, नागबीड या तालुक्यात ५ अनधिकृत कापूस बियाणे विक्री संदर्भात पोलिस केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. राज्यात अनधिकृत एच.टि.बी.टी. बियाणांची विक्री होऊ नये याकरिता कृषि आयुक्तालय, पुणे यांच्यामार्फत दिनांक २१.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी/जिल्हा पोलिस अधिक्षक यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच चंद्रपूर जिल्ह्याला लागून असलेल्या तेलंगणा राज्याच्या सीमेवर अवैध बियाणे वाहतुकीसंदर्भात पोलीसांमार्फत तपासणी करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड व शिरुर कासार (जि.बीड) तालुक्यामध्ये शेत पाणंद रस्ते व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेंतर्गतच्या कामांबाबत

**(४९) ७१४१५ (२९-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड व शिरुर कासार (जि.बीड) तालुक्यामध्ये रोजगार हमी योजनेंतर्गतने पालकमंत्री शेत पाणंद रस्ता ६०/४०, सिमेंट रस्ता ९०/१०, खडीकरण ८०/२० कामे मंजुर केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे कोणत्या निकषाद्वारे मंजूर झाले आहेत ,सदरील कामासंदर्भात खर्चीत व अखर्चित तपशील काय आहे, तसेच नागरिकांना, शेतकऱ्यांना व मजुरांना या कामामुळे दळणवळणासाठी व रहदारीसाठी उपयोग झाला आहे काय ,
(३) असल्यास, बहुतांशी कामे कार्यारंभ आदेशानंतर अंमलबजावणीसाठी व प्रत्यक्ष कामाची सुरुवात न झाल्याने अद्यापही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एनएमएमएस (नॅशनल मीन्स कम मेरिट स्कॉलरशिप स्कीम) ह्या शासनामार्फत विकसित प्रणालीद्वारे ॲपनुसारच कामकाज चालू आहे काय वा सदरील प्रणालीमुळे कामकाजाची संथगतीने होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उपरोक्त प्रलंबित कामाच्या खर्चित व अखर्चित तपशील तसेच कंत्राटी कर्मचारी सर्व प्रकारचे कामकाज पाहत असल्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.
मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांसदर्भात शासन निर्णय दि.११/११/२०२१ अन्वये धोरण विहीत करण्यात आले असून त्यानुसार शेत/पाणंद रस्त्यांच्या आराखडयांना शासनस्तरावरुन मंजूरी देण्यात येते. तसेच, मनरेगा योजनेच्या कामांकरीता आवश्यक वैधानिक बाबींची पुर्तता करुन अन्य कामे घेण्यात येत आहेत. सदरच्या कामावर बीड तालुक्यात ७३९.५३ लक्ष व शिरुर तालुक्यामध्ये ४५३.३३ लक्ष खर्च झालेला आहे, सदर कामांचा शेतकऱ्यांना व मजुरांना दळणवळणांसाठी उपयोग होत आहे.
(२) हे खरे नाही.
सदर कामांना प्रशासकिय मान्यता देण्यात आल्या असुन मजुरांमार्फत कामाची मागणी नुसार कामे पूर्ण करण्यात येत आहेत.
(३) हे खरे नाही.
केंद्रशासनाने दिलेल्या निदेशानुसार एनएमएमएस प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदविण्यात येत आहे.
तसेच कामे संथगतीने होत असल्याची बाब शासनस्तरावर निदर्शनास आलेली नाही.
(४) मनरेगा योजनेच्या कामांसंदर्भातील निधी मागणी एमआयएस या ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्यात येते व ऑनलाईन प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्यात येतो. तसेच, मनरेगा योजनेचे कामकाज कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्यामार्फत करण्यात येते.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आत्मा योजनेंतर्गत तालुका तंत्रज्ञान व सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक यांच्या प्रलंबित मानधनात वाढ करण्याबाबत

**(५०) ७१५१६ (२९-०८-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा मध्ये तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM), सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (ATM), संगणक रुपरेखक (CP) या पदावर सन २०१० पासून काम करत असताना केंद्र सरकारच्या आत्मा मार्गदर्शक सूचना सन २०१४ मध्ये नमूद केल्यानुसार दरवर्षी एकत्रित मानधनावर दहा टक्के वेतन वाढ देण्याचा निर्णय झाल्यावर सन २०१४ ते २०१६ या कालावधीत एकत्रितच्या ऐवजी मूळ मानधनावर १०% प्रमाणे मानधन वाढ देण्यात आल्यानंतर सन २०१७ पासून सन २०२३ पर्यंत केंद्र सरकारचे निर्देशानुसार मानधन वाढ देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी आयुक्त यांनी तंत्रज्ञान व्यवस्थापक व सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक यांच्या मानधन वाढीकरिता सविस्तर पत्र दिल्यानंतर राज्यातील काही जिल्हे वगळून उर्वरित जिल्ह्यांमध्ये मानधन वाढ लागू करण्यात येऊन तंत्रज्ञान व्यवस्थापक ३०,०००/-, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक २५,०००/- व संगणक रूपरेखक १६,०००/- इतके मानधन देण्यात सुरुवात झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कोणकोणते जिल्हे या आदेशामधून वळगण्यात आले असून त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, यासंदर्भात ज्या जिल्ह्यातील उक्त पदांना कृषी आयुक्त यांच्या शिफारशीनंतर अंशत: मानधन वाढ मिळाली तसेच ज्यांना अद्याप एकही मानधन वाढ मिळाली नाही अशा सर्व पदांना केंद्र सरकारच्या निर्देशानुसार सन २०१४ पासून आतापर्यंतची थकीत वेतनवाढ कधी मिळणार आहे,

(५) असल्यास, याप्रकरणी केंद्र सरकारच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१०-११-२०२३) :** (१) कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा मध्ये तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM), सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (ATM) व संगणक आज्ञावली रुपरेखक (CP) या पदांवर कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार अधिकतम मानधन मर्यादेनुसार मानधन देण्यात आलेले आहे.
(२) अधिकतम मानधन मर्यादेच्या अधिन राहून १० टक्के मानधनवाढ देणे अपेक्षित आहे असे केंद्राचे दि. २५.०२.२०२१ रोजीचे स्पष्टीकरण प्राप्त होण्यापुर्वी काही जिल्ह्यात अधिकतम मानधन मर्यादेवर आधारीत सरसकट मानधनवाढ देण्यात आली होती परंतू ती केंदं शासनाच्या स्पष्टीकरणानंतर सर्वच जिल्ह्यात रद्द करण्यात आली.
(३) केंद्र शासनाने दि. २५.०२.२०२१ रोजी दिलेल्या मार्गदर्शनानंतर, ज्या ज्या जिल्ह्यामध्ये सरसकट मानधनवाढ देण्यात आली होती, ती सर्वच मानधनवाढ रद्द करण्यात आली व मानधन वाढीपोटी अधिकतम मर्यादेपेक्षा अधिक दिलेली रक्कम वसुलीचे आदेश देण्यात आले. कोल्हापूर जिल्ह्यात मानधनवाढ दिलेली नव्हती, म्हणून तिथे वसुलीही केलेली नाही.
(४) कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा मध्ये तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM), सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (ATM) व संगणक आज्ञावली रुपरेखक (CP) या पदांवर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या सन २०१४ व सन २०१८ च्या मार्गदर्शक सूचनेनुसार अधिकतम मर्यादेपर्यंत मानधन देण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या दि. २५.०२.२०२१ च्या पत्रामध्ये नमूद केल्यानुसार सदर कर्मचाऱ्यांना सद्यस्थितीत वेतनवाढ देय नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.